कोल्हापूर, रविवार,
१ नोव्हेंबर २०२०

# हॉलोवीन ब्लू मूनचा योग १९ वर्षांनंतर

## कोल्हापूरकरांनी लुटला पिटूर चांदण्याचा आनंद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : एरव्ही पिटूर चांदणं पृथ्वीवरील काही भागात पडते, तेव्हा जमिनीवरील सूक्ष्म वस्तूही दिसतात. गार वारा अन् जागोजागी सांडलेल्या चांदण्याची अनुभूती चराचर सृष्टीत दिसते. आज १९ वर्षांनंतर आकाशाच्या रंगमंचावर हॉलोवीन ब्लू मूनचा योग आला अन् कोल्हापूरवासीय नखशिखांत पिटूर चांदण्यात भिजून गेले. प्रत्येकाने हे हॉलोवीन मून पाहिला. आजच्या



चंद्राचा हा नजारा सोशल नेटवर्किंग साईटस्वर अपलोड केला. चंद्र बरोबर सहा वाजून सहा मिनिटांनी क्षितिजावर आला. हा चंद्र ९९ टक्के प्रकाशित होता. जेव्हा एका कॅलेंडर महिन्यात दोन पूर्ण चंद्र दिसतात. त्यावेळी त्याला 'ब्लू मून' असे

**“ या पूर्वी असा योग २००१ मध्ये आला होता. यानंतर असा योग २०३९ मध्ये येईल. कालच्या 'ब्लू मून' बरोबर सूर्यमालेतील चौथा ग्रह म्हणेज मंगळ ग्रहदेखील क्षितिजावर पाहता आला. ब्लू मून हा प्रत्येक अडीच वर्षांनंतर पाहावयास मिळतो. यानंतर ऑगस्ट २०२३, मे, २०२६, डिसेंबर २०२८ मध्ये 'ब्लू मून' योग येईल.**

**-प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर,** विवेकानंद कॉलेज

म्हणतात. ऑक्टोबरमध्ये ३१ आणि एक तारखेला पूर्ण चंद्र म्हणजे दोन पौर्णिमा आल्या होत्या. महिन्याच्या एक तारखेला जो चंद्र दिसत होता, त्याला 'हार्वेस्ट मून' असे म्हणतात; तर त्याच महिन्यात ३१ ऑक्टोबरला दिसणाऱ्या चंद्राला 'ब्लू मून' असे म्हणतात. ब्लू मून म्हणजे चंद्र हा निळ्या रंगाचा दिसत नाही. काल दिसलेल्या चंद्रास 'हॉलोवीन ब्लू' म्हणतात. असा योग बरोबर १९ वर्षांनी आला.

कोल्हापूर, रविवार, १ नोव्हेंबर २०२०

# कोल्हापूरकरांनी लुटला 'हॉलोवीन ब्ल्यू मून'चा आनंद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तब्बल १९ वर्षांनंतर शनिनवारी रात्री 'हॉलोवीन ब्ल्यू मून' पाहण्याचा आनंद कोल्हापूरकरांसह खगोलप्रेमींनी लुटला. सायंकाळी चंद्र बरोबर ६ वाजून ६ मिनिटांनी क्षितिजावर आला व तो ९९ टक्के प्रकाशित होता. जेव्हा एका कॅलेंडर महिन्यामध्ये दोन पूर्ण चंद्र दिसतात, त्यावेळी त्याला 'ब्ल्यू मून' असे म्हणतात.



ऑक्टोबर महिन्यात १ व ३१ तारखेला पूर्ण चंद्र म्हणजे दोन पौर्णिमा आल्या होत्या. महिन्याच्या १ तारखेला जो चंद्र दिसत होता त्याला 'हार्वेस्ट मून' असे म्हणतात. तर याच महिन्यात ३१ ऑक्टोबरला दिसलेल्या चंद्रास 'हॉलोवीन ब्ल्यू मून' म्हणतात. ब्ल्यू मून म्हणजे चंद्र हा निळ्या रंगाचा दिसत नसतो. शनिवारी दिसलेल्या चंद्रास 'हॉलोवीन ब्ल्यू मून' म्हणतात, असा योग १९ वर्षांनी आला आहे. यापूर्वी २००१ रोजी असा योग आला होता. यानंतर २०३९ रोजी हॉलोवीन ब्ल्यू मून पाहता येणार आहे. 'ब्ल्यू मून' बरोबर सूर्य मालेतील चौथा ग्रह म्हणजे मंगळ ग्रहदेखील क्षितिजावर पाहता आला. ब्ल्यू मून हा प्रत्येक अडीच वर्षांनंतर पाहावयास मिळतो. यानंतर ऑगस्ट २०२३, मे २०२६, डिसेंबर २०२८ रोजी ब्ल्यू मून पाहण्याची संधी मिळणार आहे. ही खगोलशास्त्रातील घटना आहे. यात अंधश्रद्धा बाळगण्याची गरज नाही, अशी माहिती विवेकानंद महाविद्यालयाचे पदार्थ विज्ञान व खगोलशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.मिलिंद कारंजकर यांनी दिली.